मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# अलिशा, चमत्कार करणारा पुरुष

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



नांगर ओढण्यासाठी तेथे पुरेसे बैल नव्हते.
अजून एका बैलाची गरज होती. परंतू त्यामुळे
अलिशा नावाच्या तरुण शेतकऱ्याला नांगर
चालवण्यासाठी अडचण निर्माण झाली नाही !
जेथे अजून एका बैलाची गरज होती त्या जागी
अलिशा स्वतः नांगराला जुंपला गेला
आणि नांगर ओढू लागला. तो
निश्चितच बलवान,
हुशार,
व मेहनती
पुरुष असावा.



अलिशा शेत नांगरत असतांना,
देवाचा संदेष्टा एलिया तेथे आला
आणि त्याने अलिशाला बोलाविले.
देवाच्या सेवकासोबत जाण्यासाठी
त्या तरुणाने त्याचे शेत सोडले. एके
दिवशी देवाने एलियाला वावटळीतून
स्वर्गात नेले. त्यानंतर इस्त्राएलसाठी
अलिशा देवाचा संदेष्टा बनला.



एलिया निघून गेल्यामुळे अलिशा
जरी दुःखी होता, तरी देवाने त्याला
एलियासारखे सामर्थ्य द्यावे अशी
त्याने प्रार्थना केली.


अलिशाने एलियाच्या अंगावरुन जो
झगा खाली पडला होता तो उचलून
घेतला, आणि एलियाने केल्याप्रमाणे
त्याने तो झगा वाहत्या नदीच्या
पात्रावर मारला. आणि नदीचे
पाणी दुभागले !
देव त्याच्याबरोबर आहे
हे अलिशाला आता
कळून आले होते.



अलिशा बेथेल नावाच्या
गावाकडे चालला असता,
काही पोरे बाहेर येऊन
त्याची थट्टा करुन म्हणाले,
"अरे टकल्या, चालता हो."
अलिशा देवाचा सेवक आहे
याची त्यांना पर्वा नव्हती.
परंतू त्यांच्यासंगती एक
धक्कादायक गोष्ट घडली.
जंगलातून दोन अस्वली
बाहेर पडल्या व त्यांनी
त्यांतल्या बेचाळीस
पोरांस फाडून टाकीले.



एके दिवशी अलिशा
एका विधवा बाईला
भेटला, तिने पैसे उसने
घेतले होते परंतू ते ती
परत करु शकत नव्हती.
ज्या सावकाराने तिला
पैसे दिले होते तो तिच्या
दोन मुलांना त्याच्याकडे
गुलामी करायला घेऊन
जाऊन ते पैसे वसून
करणार होता.



अलिशा त्या
बाईस म्हणाला,
"तूं जा आणि आपल्या
शेजाऱ्यांपाजाऱ्यांकडून
बरीचशी रिकामी
भांडी मागून आण."
त्या बाईसाठी देव
काहीतरी अद्भुत
करणार होता.

त्या विधवेच्या घरात एका लहान भांड्यात थोडेसे तेल होते. परंतू त्या भांड्यातून ते तेल तिने सर्व रिकाम्या भांड्यात ओतले आणि ती सर्व रिकामी भांडी तेलाने भरुन गेली ! त्या दिवसांत जर आंघोळ करण्याचे बाथटब राहिले असते तर परमेश्वराने ते देखिल तेलाने भरले असते का? विधवेने ते तेल विकून तिच्या मुलांची सुटका केली.



दुसऱ्या एका बाईने व तिच्या पतीने त्यांच्या घरात एक विशेष खोली तयार केली होती जेणे करुन जेंव्हा केंव्हा अलिशा त्या वाटेने जाईल तेंव्हा तो त्यांच्या घरात तेथे थांबणार. त्या खोलीत त्यांनी एक बिछाना, एक टेबल, एक खुर्ची, आणि एक समई अशा वस्तू ठेवल्या. ती खोली हमेशा अलिशासाठी राखून ठेवण्यात येत असे.



या जोडप्याने दाखवलेल्या दयाळूपणाची परतफेड कशी करावी याविषयी अलिशा विचार करित होता. त्यांना मुलबाळ नाही असे जेंव्हा त्याला कळले तेंव्हा अलिशाने त्यांना जे काही सांगितले त्यावर ती बाई विश्वासच करु शकत नव्हती. तो तीला म्हणाला, "पुढच्या वर्षी याच वेळेला, तूं पुत्रास उराशी धरशील." खात्रीपुर्वक एका वर्षानंतर, बाळ जन्मास आले.



काही वर्षांनंतर तो मुलगा त्याच्या वडीलांसंगती शेतात गेला. तो आपल्या बापास म्हणाला, "माझे डोके, माझे डोके" जेंव्हा त्या मुलाला त्याच्या आईकडे नेण्यात आले, तेंव्हा तो दुपारपर्यंत तिच्या मांडीवर होता, आणि मग मरण पावला. आईने त्या मुलाला अलिशाच्या खोलित नेऊन ठेवले. तिला कोण मदत करेल असे तुम्हांला वाटते?



तुम्ही अलिशाचे नाव घेतले का? ते अगदी बरोबर आहे ! तिने गाढवावर खोगिर घातले आणि घाई-घाईने त्याला शोधण्यासाठी ती बाहेर पडली. अलिशा तिच्या घरि आला, तो वर एकटाच त्या खोलित गेला आणि त्याने प्रार्थना केली. देवाने त्या मुलाचे जिवन परत दिले. अलिशाने त्या बाईला बोलावून म्हटले, "आपल्या पुत्राला उचलून घे." तिला किती आनंद झाला असेल.





जवळील सीरिया नावाच्या देशात, नामान नावाचा एक सैनापती राहत होता. तो शूरविर होता, परंतू त्याला भयानक आजार जडला होता; त्याला कुष्टरोग झाला होता.

इस्त्राएलातून धरुन आणलेली एक
लहान मुलगी नामानाच्या पत्नीची
सेवा करण्यासाठी ठेवली होती. त्या
लहान मुलीने सांगितले, "जर नामान
इस्त्राएलांत असलेल्या संदेष्ट्याला
भेटले असते, तर त्यांनी त्यांचा
कुष्टरोग बरा केला असता."



त्या संदेष्ट्याला भेटण्यास नामान निघाला.
त्या संदेष्ट्याला भेट देण्यासाठी त्याने, सोने,
चांदी, आणि सुंदर कपडे सोबत घेतले.





अलिशाचा सेवक घराबाहेर आला आणि म्हणाला, "जा, यार्देन नदीत जाऊन सात वेळा स्नान कर म्हणजे तूं शुध्द् होशील." हे ऐकून नामानाचा राग भडकला. तो सीरिया देशातील नदींच्या स्वच्छ आणि ताज्या पाण्यात स्वतःला धुवू शकत नव्हता का? रागा–रागाने तो परत त्याच्या घराकडे जावयास निघाला.



अलिशाने सांगितलेला आदेश पाळण्याविषयी नामानाच्या सेवकांनी त्याला सांगितले, हि नामानासाठी चांगली गोष्ट घडली. म्हणून नामान यार्देन नदीत गेला आणि यार्देन नदीत सात वेळा डुबकी मारली. आणि नामान कोडी बरा झाला ! नामानाने अलिशाच्या देवाची; जिवंत देवाची ज्या देवाने त्याचे कोड बरे केले होते त्याची भक्ति केली.



देवाने त्याचा सेवक अलिशा याचा त्याच्या मरणानंतर देखिल उपयोग केला. एके दिवशी एका मनुष्याला त्याच जागेवर पुरले जेथे अलिशाला फार वर्षांपुर्वी पुरलेले होते. जेंव्हा त्या मनुष्याच्या प्रेताला अलिशाच्या हाडांचा स्पर्श झाला, तेंव्हा तो मनुष्य जिवंत होऊन त्याच्या पायावर उठून उभा राहिला. खरोखर त्याचा विश्वासू सेवक अलिशा याच्याव्द्वारे परमेश्वर देवाने त्याचे महान सामर्थ्य प्रकट केले.

अलिशा, चमत्कार करणारा पुरुष

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

२ राजे २-१३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16